# प्रेसनोट

दि. ०१/०७/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहुरी पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.७८०/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | सुनिल भागवत भवर, वय–४६ वर्ष, महसूल सहायक, वर्ग–३, नेमणुक शासकीय वसुली विभाग, तहसिल कार्यालय, राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २,०००/– रुपये तडजोडीअंती १,५००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,५००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांची मौजे रामपूर तालुका राहुरी येथे गट क्रमांक ३७२/२ क्षेत्र ६० आर इतकी शेत जमीन असून त्यापैकी ३० आर क्षेत्राचे कब्जेदार सदरी महाराष्ट्र सरकारचे नाव आहे. सदरचे नाव हे कमी करावयाचे राहिले असल्यामुळे तसे पत्र तलाठी रामपूर यांना देण्यासाठी आरोपी लोकसेवक सुनिल भागवत भवर, वय–४६ वर्ष, महसूल सहायक, वर्ग–३, नेमणुक शासकीय वसुली विभाग, तहसिल कार्यालय, राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांनी दि.०१/०७/२०२४ रोजी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष २०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती १५००/– लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली व सदरची लाच रक्कम दि.०१/०७/२०२४ रोजी पंचासमक्ष तहसिल कार्यालय, राहुरी येथे स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेवक सुनिल भागवत भवर यांचेविरुध्द राहुरी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गुरनं.७८०/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.०१/०७/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ऑप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर